## मंगलाबाई भागवत फाऊंडेशन

**इयत्ता : दहावी**

**वेळ : २ तास** | **विषय : भूगोल** | **गुण : ४०**

---

**प्र. 1 अ) अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** (4)

1) ब्राझील हा देश ------- निर्यातीत अग्रेसर आहे.

i) खनिज तेलाच्या ii) चहाच्या iii) बाजरीच्या iv) कॉफीच्या

2) साग हा वृक्ष प्रामुख्याने ------- वनात आढळतो.

i) समुद्र काठ ii) काटेरी iii) पानझडी iv) सूचीपर्णी

3) क्षेत्रभेटीसाठी ------ हे उपयुक्त साहित्य नाही.

i) आरेखन दंड ii) कॅमेरा iii) नकाशा iv) नोंदवही

4) माराजॉ हे किनारी बेट ॲमेझॉन व ------ नद्यांच्या मुखादरम्यान आहे.

i) निग्रो ii) सावो फ्रान्सिस्को iii) टोकॅटिन्स iv) पॅराना

**प्र. 2 ब) योग्य जोड्या जुळवा** (4)

| ‘अ’ | | ‘ब’ |
|---|---|---|
| i) ब्राझील | – | i) मान्सून |
| ii) भारताचे हवामान | – | ii) सुवर्ण चतुर्भुजा महामार्ग |
| iii) गोवा | – | iii) सांबा नृत्य |
| iv) रस्ते वाहतूक | – | iv) विरळ वस्ती |
| | | v) सर्वाधिक नागरीकरण |

**प्र. 3 अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (फक्त चार)** (4)

1) भारतीय प्रमाणवेळेचे रेखावृत्त कोणत्या शहराजवळून जाते ?

2) ब्राझीलमध्ये कोणती शासन प्रणाली आहे ?

3) ब्राझीलची अर्थव्यवस्था कोणत्या प्रकारची आहे ?

4) राजस्थानचा मैदानी प्रदेश कोणत्या नावाने प्रसिध्द आहे?

5) वाघ व सिंह या दोन्ही प्राण्यांचा अधिवास असणारा जगातील एकमेव देश कोणता?

**प्र. 4 अ) तुम्हाला पुरविण्यात आलेल्या ब्राझीलच्या नकाशात पुढील घटक दाखवा.**
**सूची आवश्यक आहे. (फक्त 4)** (4)

i) आमापा राज्य

ii) ब्राझीलिया – राजधानी


iii) सर्वाधिक लोकसंख्येची घनता असलेले राज्य – रिओ–दी–जनेरिओ

iv) पॅराग्वे नदी

v) पंपास – गवताळ प्रदेश

**आ) दिलेल्या नकाशाचे वाचन करुन त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**(कोणतेही 4)** **(4)**




**प्रश्न :**

i) अरबी समुद्रातील बेटाचे नाव सांगा.

ii) भारताचे अतिदक्षिणेकडील टोक कोणते ?

iii) भारताच्या उत्तरेकडील कोणत्याही दोन देशांची नावे लिहा.

iv) भारताच्या मध्यभागातून गेलेल्या अक्षवृत्ताचे अंशात्मक मूल्य किती आहे ?

v) भारताचे पूर्व-पश्चिम अंतर किती आहे ?

**प्र.** 5 **भौगोलिक कारणे लिहा. (फक्त दोन)** **(4)**

i) ॲमेझॉन नदीच्या मुखाकडे गाळाचे संचयन फार मोठ्या प्रमाणावर होत नाही.

ii) ब्राझीलमधील सदाहरित वर्षावनांना “जगाची फुफ्फुसे” असे संबोधतात.

iii) भारत हा सर्वाधिक स्मार्ट फोन आणि इंटरनेट वापरणाऱ्यांचा देश बनला आहे.

iv) भारताच्या अर्थव्यवस्थेत मत्स्य व्यवसायाची भूमिका महत्त्वाची आहे.

**प्र.** 6 **अ) खालील दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा रेषालेख काढा व खालील प्रश्नांची**

**उत्तरे लिहा.** (6)

**भारत : स्थूल आंतरदेशीय व्यापारातील हिस्सा**

**(सन –** 1980 **ते** 2016**)**


| **वर्षे** | **व्यापारातील राष्ट्रीय उत्पन्न (टक्केवारीत)** |
|---|---|
| 1980 | 15 |
| 1990 | 20 |
| 2000 | 28 |
| 2010 | 50 |
| 2016 | 40 |

**प्रश्न :**

1) वरील आलेख काय दर्शवितो ?
2) 2010 साली एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील व्यापाराचा हिस्सा किती होता ?
3) 2010 **ते** 2016 या कालावधीत स्थूल आंतरदेशीय उत्पादनात किती टक्क्याने घट झाली ?

**किंवा**

**आ) दिलेल्या आलेखाचे वाचन करुन त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**



**प्रश्न :**

1) वरील आलेखाचा प्रकार कोणता आहे ?
2) या आलेखात कोणत्या बाबी दाखवल्या आहेत ?
3) या आलेखातील कोणत्या देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनात पर्यटन व्यवसायाचे योगदान जास्त आहे ?
4) या आलेखातील एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत पर्यटन व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या जास्त असलेला देश कोणता आहे ?
5) या आलेखातील भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील पर्यटन क्षेत्राचा वाटा किती टक्के आहे ?
6) वरील आलेख कोणत्या वर्षाचा आहे ?

**प्र.** 7 **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणत्याही दोन)** **(**8**)**

1) ब्राझील मधील शुष्क प्रदेशास "अवर्षण चतुष्कोण" असे का संबोधतात ?
2) क्षेत्रभेटीची आवश्यकता स्पष्ट करा.
3) ब्राझील मधील सावो पावलो येथे मानवी वस्ती केंद्रीत झालेली का आढळते ?

*****